Raymond
LIFESTYLE LIMITED
(Formerly known as
Raymond Consumer Care Limited)

Great Place To Work. Certified FEB 2023 – FEB 2024 INDIA

RLL/SE/25-26/10

May 13, 2025

To

| | |
|---|---|
| The Department of Corporate Services - CRD | The National Stock Exchange of India Limited |
| BSE Limited | Exchange Plaza, 5th Floor |
| P.J. Towers, Dalal Street | Bandra-Kurla Complex |
| Mumbai - 400 001 | Bandra (East), Mumbai - 400 051 |
| Scrip Code: 500330 | Symbol: RAYMOND |

Dear Sir/Madam,

**Sub: Raymond Lifestyle Limited: Compliance pursuant to Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")**

Pursuant to Regulation 30 of the Listing Regulations, please find enclosed copy of extract of Audited Financial Results of the Company for the quarter and financial year ended March 31, 2025 published today in Loksatta (Marathi) newspapers in accordance with Regulation 47 of the Listing Regulations.

Please take the above disclosure on record.

Thanking you.

Yours faithfully,

For **Raymond Lifestyle Limited**

Priti Nitin Alkari
Digitally signed by Priti Nitin Alkari
Date: 2025.05.13 17:44:31 +05'30'

**Priti Alkari**
**Company Secretary**

Encl.: as above

# मराठवाड्यात पुन्हा अवकाळी

## वीज पडून एकाचा मृत्यू, जनावरे दगावली

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात सोमवारी विविध भागांत अवकाळी पावसाने झोडपले. जालना जिल्ह्यात भाटेपुरी येथे वीज पडून एकाचा मृत्यू झाला. विठ्ठल गंगाधर कावळे (वय २४) असे मृत व्यक्तीचे नाव असून, अनेक भागात वीज पडून जनावरे दगावल्याचे वृत्त आहे. अंबड तालुक्यातील कृष्णा केरुभान सोनवणे यांची घरासमारील भिंत पावसामुळे पडल्याचे सांगण्यात आले.

जालना, बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह दुपारी जोरदार पाऊस झाला. वेरुळ परिसरात पडलेल्या पावसाने लेणीच्या वरच्या बाजूने धबधबा सुरू झाल्याचे सांगण्यात आले. अनेक भागांत जोरदार पाऊस झाला. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात मौजे थेरला येथे गायीचा मृत्यू झाल्याचे तहसीलदारांनी महसूल विभागातील वरिष्ठांना सांगितले आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्येही पावसाची एक जोरदार सर येऊन गेली. खुलताबाद, गंगापूर, वैजापूर या तालुक्यातही पाऊस पडल्याचे वृत्त आहे. सोसाट्याच्या वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे वातावरण बदलले आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली आहेत. बीड शहरातील पेट्रोल पंपावरील पत्रे उडाल्याने दोघेजण जखमी झाले आहेत.

तापमानातही मोठी घट दिसून आली आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस, तर किमान तापमान २६ अंशांपर्यंत खाली आले. दोन दिवसांपूर्वी ते ३७.४ अंशांवर होते.

# अप्रमाणित बियाण्यांच्या कारवाईवर खरीप हंगाम बैठकीत प्रश्नचिन्ह

## कायद्यातील तरतुदीत बदल करण्याची चर्चा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उगवण क्षमता नसणारे तसेच विविध कारणांमुळे बाद ठरलेल्या ६९ अप्रमाणित बियाणे विक्री करणाऱ्या ४४ जणांचे परवाने निलंबित करण्यात आले. ३२ पुरवठादारांनी पुढे विक्री करू नये असे आदेश बजावले असले तरी ही कारवाई पुरेशी नाही. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हे का दाखल होत नाहीत, असा प्रश्न आमदारांनी उपस्थित केला. त्यावर सरसकट गुन्हे दाखल करण्यासाठी कायद्याच्या तरतुदीमध्ये बदल करावे लागतील, अशी चर्चा सोमवारी खरीप हंगाम बैठकीत करण्यात आली. या चर्चेत आमदार प्रशांत बंब, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी सहभाग घेतला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात या वर्षीच्या खरीप हंगामात सरासरीपेक्षा कापसाचे क्षेत्र कमी होईल अशी आकडेवारी कृषी विभागाने पालकमंत्री संजय शिरसाट यांच्यासमोर मांडली. या बैठकीस अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, खासदार कल्याण काळे, आमदार प्रशांत बंब, प्रा. रमेश बोरनारे आदींची उपस्थिती होती.

जिल्ह्यात सरासरी तीन लाख ८७ हजार १४६ हेक्टर क्षेत्रावर कापूस पेरला जात असे. त्यात घट होईल अशी आकडेवारी मांडण्यात आली आहे. त्याऐवजी मक्याचा पेरा वाढेल असे सांगण्यात आले. या अनुषंगाने बोलताना जिल्हा कृषी अधीक्षक डॉ. प्रकाश देशमुख म्हणाले, 'मका पिकांचे भाव या वर्षी स्थिर राहिले. २२०० ते २३०० रुपये प्रतिक्विंटल असा दर असून जिल्ह्यातील सरासरी उत्पादकता ३० क्विंटल एवढी आहे. तुलनेने कापसाच्या दराचे प्रश्न आहेत. तसेच उत्पादकता घटलेली असल्याने कापूस पेरा काहीसा घटेल.' खरीप हंगाम आढावा बैठकीत बनावट बियाणांचा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. गंगापूरचे आमदार प्रशांत बंब म्हणाले की, बनावट किंवा अप्रमाणित बियाणे प्रकरणात विक्रेत्यांवर गुन्हे दाखल होत नाही. केवळ परवाने रद्द होतात. विक्रेते मग पत्नीच्या नावावर पुन्हा परवाने मिळवतात. यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. ज्या शेतकऱ्यांना बनावट बियाणे दिले गेले. त्या कंपनीकडून नुकसान भरपाई वसूल करावी आणि ती शेतकऱ्यांना द्यावी, अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.' या विषयी राज्यस्तरीय कायद्यात बदल करावे लागतील, असे या वेळी सांगण्यात आले. वेळेवर पीककर्ज मिळत नसल्याच्या तक्रारी येतात. पण कर्ज देण्यास नाहक उशीर करणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याची मागणीही या बैठकीत करण्यात आली.

### 'मागेल त्याला कृषी पंप'वरून खडाजंगी

मागेल त्याला कृषिपंप देण्याच्या योजनेचे निकष कमी करण्याच्या अनुषंगाने खासदार संदीपान भुमरे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर याबाबतची पूर्ण माहिती नसल्याचे मंत्री अतुल सावे यांनी मान्य केले. मात्र, तो प्रश्न पुन्हा खासदार काळे यांनी उपस्थित केल्याने सावे वैतागले. केवळ विरोधक आहोत, म्हणून वैतागून बोलू नका, असे खासदार काळे यांनी सुनावल्याचे सांगण्यात आले. या अनुषंगाने बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार अनुदानासाठी अर्ज केलेल्या २६ हजार ९२१ पैकी केवळ ५२२ सौर कृषी पंप बसवले असल्याची माहिती सादर करण्यात आली. पडताळणी पूर्ण झालेल्या अर्जांची संख्या १८ हजार ८२९ एवढी आहे.

# मुलांना भीक मागण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या माय-लेकीला सक्तमजुरी

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुलांना त्यांच्या आई-वडिलांकडून विकत घेतल्यानंतर मारहाण करून भीक मागण्यास प्रवृत्त करणाऱ्या माय-लेकीला सक्तमजुरी आणि प्रत्येकी पाच हजार रुपये दंडाची शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश साबिना मलिक यांनी सुनावली. जनाबाई उत्तम जाधव (५९) आणि सविता संतोष पगारे (३३, दोघी रा. मुकुंदवाडी) अशी आरोपी महिलांची नावे आहेत. जनाबाईला एक वर्षाची, तर सविताला तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.

संजयनगर, मुकुंदवाडीत राहणारे देवराज नाथाजी वीर (४७) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, १ सप्टेंबर २०२१ रोजी दुपारी फिर्यादीला नातेवाईक महिलेने फोन करून माहिती दिली, की रामनगरात राहणाऱ्या जनाबाई जाधव व तिची मुलगी सविता पगारे या दोघी त्यांच्या ताब्यात असलेल्या मुलाला लाटण्याने बेदम मारहाण करीत आहेत. ही माहिती मिळताच वीर यांनी रामनगर गाठून मुलाला आरोपी महिलांच्या ताब्यातून वेगळे केले व पोलिसांना कळवले. पोलिसांनी दोन्ही महिलांसह पीडित मुलाला पोलीस ठाण्यात आणले. तेथे बालसंरक्षण कक्षाच्या अधिकारी ॲड. सुप्रिया इंगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पीडित मुलाची चौकशी केली असता त्याने आरोपी महिलांनी मला भीक मागण्यासाठी आणले आहे, भीक मागण्यास नकार दिल्यास त्या मारहाण करतात, असे सांगितले.

समितीच्या अधिकाऱ्यांनी आरोपी सविता पगारे हिची चौकशी केली असता, तिने सांगितले, की पीडित मुलाला त्याच्या आई-वडिलांकडून ५५ हजारांना विकत घेतले आहे. तसेच, जालन्यातील एका दोन वर्षांच्या मुलालाही त्याच्या आई-वडिलांकडून एक लाख रुपयांत दत्तक म्हणून विकत घेतले आहे. तसा शंभर रुपयांच्या बॉण्ड पेपर व लेखी करारनामाही केला असल्याचे सविताने सांगितले. प्रकरणात मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणात तत्कालीन उपनिरीक्षक श्रीकांत भराटे यांनी दोषारोपपत्र दाखल केले. अतिरिक्त सरकारी वकील सचिन सूर्यवंशी यांनी पाच साक्षीदार तपासले.

# भीषण अपघातात हैदराबादमधील दाम्पत्य ठार; पाच गंभीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** हैदराबादहून शिर्डी येथे दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या वाहनास मालमोटारीने दिलेल्या धडकेत दाम्पत्य ठार झाले. अन्य पाच जण गंभीर झाले आहेत. रविवारी रात्री ११.३० च्या सुमारास धुळे-सोलापूर महामार्गावरील वडीगोद्रीपासून काही अंतरावर असलेल्या बारसवाडा फाट्यानजीक हा अपघात घडला.

अपघात एवढा भीषण होता, की 'जेसीबी'च्या साहाय्याने वाहने बाजूला करून मृतदेह बाहेर काढण्यात आले.

जी. रामू (वय ४५) व जी. माधुरी (४०, दोघेही रा. हैदराबाद) जागीच ठार झाले. तर श्रीवाणी (४१), अनुषा (१७), मेघना (१२), ऋषिका (७), नागेश्वर राव (४५) हे गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघातग्रस्त कुटुंब हैदराबाद येथून शिर्डी येथे दर्शन करण्यासाठी जात होते. मोटारीमधून ७ जण रविवारी दुपारी १२ वाजता निघाले होते. धुळे-सोलापूर महामार्गावरील बारसवाडा फाट्याजवळ विरुद्ध दिशेने येणाऱ्या विनाक्रमांकाच्या भरधाव हायवाची आणि मोटारीची जोराची धडक झाली.

### वाळूजमध्ये दुचाकीस्वारास फरफटत नेले

पंढरपूरच्या कामगार चौकात ट्रकचालकाने स्कूटीस्वारास दूरवर फरफटत नेले. सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास ही घटना घडली. दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी एमआयडीसी पोलिसांनी धाव घेत वाहतूक सुरळीत केली व मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठवला.

# किसनराव भिसे यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** जालन्याच्या



मंठा तालुक्यातील जयपूर गावचे मूळ रहिवासी किसनराव सोनिबा भिसे (वय ९०) यांचे सोमवार पहाटे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जयपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. 'इंडियन एक्स्प्रेस'चे संभाजीनगर शहराचे मुख्य वितरक विलास भिसे यांचे ते वडील होत.

# दोघांवर हल्लाप्रकरणी चार आरोपींना कारावास

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भंगार हटवण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून तरुणासह त्याच्या भावावर हल्ला केल्याप्रकरणी चार आरोपींना एक वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी तीन हजार रुपये दंडाची शिक्षा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए.व्ही. मुसळे यांनी सुनावली. बरोबरच आरोपींना सुनावलेल्या दंडाच्या रकमेपैकी ८ हजार रुपये नुकसान भरपाई म्हणून फिर्यादीला देण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

गोविंद यशवंत बोबडे (४७), विशाल सर्जेराव बोदडे (२८), प्रशांत उर्फ पप्पू बोदडे (३२), शुभम सर्जेराव बोदडे (२२, सर्व रा. काश्मिरनगर, कांचनवाडी) अशी आरोपींची नावे आहेत.

प्रकरणात राहुल दामोधर खंडागळे (२५, रा. राहुल नगर) यांनी फिर्याद दिली होती. आग लागलेल्या भंगार दुकानाची ५ मे २०२१ रोजी साफसफाई करत असताना शेजारी राहणारे गोविंद बोबडे यांनी घरासमोर कचरा आल्याने वाद घातला. त्यावरून राहुलसह त्यांचा भाऊ आकाश खंडागळे यांना मारहाण केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. प्रकरणात सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

प्रकरणात तपास अधिकारी तत्कालीन हवालदार केशवा काकडे यांनी दोषारोपपत्र दाखल केले. सहायक सरकारी वकील सविता हिवराळे यांनी साक्षीदार तपासले. सुनावणीअंती न्यायालयाने चारही आरोपींना दोषी ठरवून वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली.

# बीडमध्ये गुन्हेगारांच्या चार टोळ्यांना 'मकोका'

## ९ पोलिसांचे निलंबन, २ अधिकाऱ्यांसह चौघे बडतर्फ

लोकसत्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बीड जिल्ह्यातील गुंडगिरी मोडीत काढण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. याअंतर्गत वाल्मीक कराडसह चार टोळ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, मागील पाच महिन्यांत ११ पोलिसांना निलंबित केले आहे. त्यातील दोघांचे निलंबन दोन महिन्यांतच मागे घेण्यात आले आहे, तर दोन पोलीस अधिकाऱ्यांसह चौघांना बीडच्या पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आले आहे.

बीड पोलीस अधीक्षक कार्यालयातून ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली आहे. बीड पोलीस अधीक्षकांकडून सुरू असलेल्या या कारवाईमध्ये परळीतील फड टोळीवर रविवारी मकोका कायद्यान्तर्गत कारवाई करण्यात आली आहे. रघुनाथ फड व इतर ७ ते ८ जणांनी १८ ऑक्टोबर २०२३ रोजी सहदेव वाल्मीक सातभाई यांना अडवून मारहाण सव्वादोन लाख रुपये लुटले होते. याप्रकरणी रघुनाथ रामराव फडसह जगन्नाथ विक्रम फड, सुदीप रावसाहेब सोनवणे, बालाजी अंकुश दहिफळे (सर्व रा. परळी) व विलास बालाजी गिते (रा. नंदागौळ, ता. परळी) यांना अटक करण्यात आली आहे. धनराज ऊर्फ राजेभाऊ फड व ग्यानदेव ऊर्फ गोट्या गिते हे दोघे पसार आहेत. या टोळीने परळी व अंबाजोगाई परिसरात दहशत माजवली असून, दोन्ही हद्दीत १० गुन्हे केल्याचे उघडकीस आले. यातील ९ गुन्ह्यांची दखल न्यायालयाने घेतली.

या टोळीवर मकोका लावण्याचा प्रस्ताव ४ मे रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांच्याकडे पाठवला होता. त्यानुसार मकोका लावण्यास परवानगी दिल्याचे बीडच्या पोलीस विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. यापूर्वी वाल्मीक कराड व त्याच्या टोळीवर मकोका अंतर्गत कारवाई केली आहे.

खोक्या ऊर्फ सतीश भोसलेवरही मकोकाची कारवाई केली आहे. अन्य एका टोळीवरही मकोका लावण्यात आला आहे.

या शिवाय बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यापासून नवनीत कॉवत यांनी मागील पाच महिन्यांत ११ पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली होती. यामध्ये खोक्याला कारागृहाच्या आवारात विशेष सेवा-सवलत दिल्याचा ठपका ठेवत विनोद सुरवसे व कैलास खटाणे या पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती.

मात्र, नुकतेच या दोन कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेतले. तर पोलीस निरीक्षक सुनील नागरगोजे व उपनिरीक्षक रणजित कासले यांना छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी बडतर्फ केली आहे. दोन शिपायांना पोलीस अधीक्षकांनी बडतर्फ केले.

> आतापर्यंत ११ पोलिसांना विविध कारणांस्तव निलंबित केले आहे. त्यातील दोघांचे निलंबन शासन निर्णयातील तरतुदीनुसार दोन दिवसांपूर्वी मागे घेण्यात आले. चार टोळ्यांवर मकोकाअंतर्गत कारवाई केली आहे. आणखीही तीन प्रकरणांत मकोका लावण्याचे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत. दोन अधिकाऱ्यांसह दोन शिपायांना बडतर्फ करण्यात आले आहे.
> **– नवनीत कॉवत,** पोलीस अधीक्षक


Raymond
LIFESTYLE LIMITED
(यापूर्वीची ओळख रेमंड कन्झ्युमर केअर लिमिटेड)
सीआयएन : L74999MH2018PLC316288
नोंदणीकृत कार्यालय : प्लॉट जी -३५ आणि ३६, एमआयडीसी, वाळूज, तालुका गंगापूर, छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद), ४३१ १३६, महाराष्ट्र.
ई-मेल : corp.secretarial@raymond.in; संकेतस्थळ : raymondlifestyle.com
दूरध्वनी क्रमांक : +९१ २४० ६६४४१११, कॉर्पोरेट कार्यालय दूरध्वनी क्रमांक : +९१ २२ ६१५२७०००

**३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षाच्या एकत्रित वित्तीय निकालांचा सारांश**

(रुपये लाखांत, नमूद केलेले वगळून)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले आर्थिक वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१.०३.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.०३.२०२४ | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ |
| | | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| १ | कार्यान्वयनातून मिळालेले एकूण उत्पन्न | १४९४१५ | १७५४२१ | १६८४५५ | ६१७६७४ | ६५३५४१ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा करपूर्व आणि अपवादात्मक बाबींच्या आधी | (४५३१) | ८७१३ | १७१६९ | १२२२९ | ६४८९८ |
| ३ | करपूर्व निव्वळ नफा अपवादात्मक बाबींच्या पश्चात | (४७२९) | ८६७५ | १७१६९ | ६००१ | ६३९७९ |
| ४ | कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा | (४४९५) | ६४१७ | १२९४४ | ३८१९ | ४७९५२ |
| ५ | **कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा (खंडित कार्यान्वयन)** | – | – | १०,६१४ | – | २१६५२० |
| ६ | **कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (ज्यात कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा आणि करपश्चात अन्य सर्वंकष उत्पन्न यांचा समावेश आहे)** | (३०३२) | ६००७ | २३३८० | ४७३६ | २६४५०३ |
| ७ | ताळेबंदात दर्शित केल्याप्रमाणे राखीव निधी | – | – | – | ९,५७,५४९ | ९,६४,९९८ |
| ८ | पेड अप इक्विटी समभाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. २/– प्रति समभाग) | १२१८ | १२१८ | १५३ | १२१८ | १५३ |
| | इक्विटी समभाग भांडवल प्रलंबित वितरण | – | – | १०६५ | – | १०६५ |
| ९ | **प्रति समभाग अर्जन (रु. २/– प्रत्येकी) (वार्षिकीकृत नाही)** | | | | | |
| | **अखंडित कार्यान्वयन** मूळ आणि मिश्रित# | (७.३८) | १०.५३ | २१.२५ | ६.२७ | ७८.७१ |
| | **खंडित कार्यान्वयन (एफएमसीजी व्यवसाय)** मूळ आणि मिश्रित | – | – | १७.४२ | – | ३५५.४० |
| | **अखंडित कार्यान्वयन आणि खंडित कार्यान्वयन** मूळ आणि मिश्रित# | (७.३८) | १०.५३ | ३८.६७ | ६.२७ | ४३४.११ |

# ३१ मार्च २०२५ रोजी प्रस्तावित इक्विटी समभाग परिणाम अँटी डायल्युटिव्ह आहेत.

**सूचना**

१. रेमंड लाइफस्टाइल लिमिटेड ('कंपनी' किंवा 'धारक कंपनी') आणि त्यांच्या उप कंपन्या (एकत्रित उल्लेख समूह) यांचे हे एकत्रित वित्तीय निकाल (पत्रक) इंडियन अकौंटिंग स्टँडर्ड्स ('आयएनडी एएस') ३४ 'इंटारीम फिनान्शिअल रिपोर्टींग') प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार तसेच कंपनी कायदा २०१३ ('कायदा') कलम १३३ मध्ये वर्णित करण्यात आल्यावर आणि भारतात सर्वमान्य असलेल्या लेखांकन मानकानुसार तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) अधिनियम २०१५ (सुधारित) लिस्टिंग रेग्युलेशन्स) चा नियम ३३ आणि नियम ५२ आणि नियम ६३च्या अनुसार तयार करण्यात आले आहेत.

२. **रेमंड लाइफस्टाइल लिमिटेड यांचे वित्तीय निकाल (स्वतंत्र माहिती)** **(रुपये लाखांत, नमूद केलेले वगळून)**

| तपशील | संपलेली तिमाही | | | संपलेले आर्थिक वर्ष | |
|---|---|---|---|---|---|
| | ३१.०३.२०२५ | ३१.१२.२०२४ | ३१.०३.२०२४ | ३१.०३.२०२५ | ३१.०३.२०२४ |
| | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (अलेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) | (लेखापरीक्षित) |
| कार्यान्वयनातून महसूल (उलाढाल) | ११४२९८ | १३४००४ | १३३६७० | ४६८१२८ | ५०७३५९ |
| करपूर्व नफा (अखंडित कार्यान्वयन) | (८०७६) | ७२९८ | १३३१५ | (४८३) | ५२०५२ |
| करपश्चात नफा (अखंडित कार्यान्वयन ) | (६४४९) | ५३२९ | ९९९१ | (९००) | ३९२३० |

३. वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेला तपशील हा ३१ मार्च २०२५ रोजी संपलेली तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेल्या विस्तृत एकत्रित आणि स्वतंत्र वित्तीय निकालांचा सारांश आहे जी पत्रके सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स )अधिनियम २०१५ चा नियम ३३ च्या अनुसार भांडवली बाजाराकडे सादर करण्यात आली आहेत.

३१ मार्च २०२५ रोजी संपलेली तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी तयार करण्यात आलेले विस्तृत एकत्रित आणि स्वतंत्र वित्तीय निकाल गुंतवणूकदारांसाठी bsites www.raymondlifestyle.com, www.bseindia.com and www.nseindia.com संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

४. वरील निकालांचा कंपनीच्या अंकेक्षण समितीने दिनांक १० मे २०२५ रोजी आढावा घेतलेला असून त्यांची शिफारस केली आहेत तसेच कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या दिनांक १२ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत त्यांना मान्यता दिली आहे. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेली तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी जारी करण्यात आलेल्या आढावा अहवालात अर्हता सुधारणा नाही.

मुंबई
१२ मे २०२५

गौतम हरी सिंघानिया
कार्यकारी अध्यक्ष


# आयुक्तालयावर अजित पवारांचे मौन

लोकसत्ता वार्ताहर

**नांदेड :** मराठवाड्यातील दुसऱ्या महसूल आयुक्तालयाच्या विषयाचा जिल्ह्यातील भाजपासह काँग्रेस पक्षाच्याही आजी-माजी लोकप्रतिनिधींना विसर पडलेला असताना काँग्रेस पक्षातील काही तरुण कार्यकर्त्यांनी वरील प्रलंबित विषयाकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लक्ष वेधले आहे. पण मुखेड तालुक्यात झालेल्या एका जाहीर कार्यक्रमात पवार यांनी आयुक्तालय सोडून इतर मागण्यांच्या बाबतीत आपल्या पक्षाच्या स्थानिक नेत्यांसह जिल्हावासीयांना आश्वस्त केले.

मुखेड तालुक्यातील नियोजित पक्षप्रवेश सोहळा आणि देगलूर तालुक्याच्या भेटीसाठी उपमुख्यमंत्री पवार आणि राज्यमंत्री इंद्रनील नाईक रविवारी नांदेडमध्ये आले होते. सकाळी येथे दाखल झाल्यानंतर पवार यांनी माजी आमदार मोहन हंबर्डे यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि नंतर ते मुखेड तालुक्याकडे रवाना झाले.

या भेटीदरम्यान काँग्रेसचे मुदखेड तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, संदीपकुमार देशमुख बारडकर आणि हनुमंत राजेगोरे यांनी उपमुख्यमंत्र्यांना नांदेड येथे मंजूर असलेल्या विभागीय आयुक्तालयाच्या निर्मितीसंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही आठवड्यात पवार यांची याच विषयावर एका शिष्टमंडळाने मुंबईत भेट घेतली होती. नंतर माजी खासदार भास्करराव खतगावकर यांनीही एका भेटीदरम्यान आयुक्तालयाच्या मागणीकडे त्यांचे लक्ष वेधले होते. नांदेडच्या आयुक्तालयाचा विषय सीमावादासारखा झाला आहे, असे अजब वक्तव्य काही दिवसांपूर्वी करणाऱ्या पवार यांनी रविवारी काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेत हा विषय महत्त्वपूर्ण असून त्यात लक्ष घालण्याचे आश्वासन दिले.

चव्हाणवाडी येथे पवार यांच्या उपस्थितीत काँग्रेस व इतर पक्षांतील अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर, पक्षाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात खतगावकर-चिखलीकर प्रभृतींनी पवार यांच्यासमोर मुखेड तालुक्यातील लेंडी प्रकल्पासह अन्य प्रलंबित मागण्या मांडल्या. या कार्यक्रमाचा समारोप करताना पवार यांनी लेंडी प्रकल्प, मनार प्रकल्पाच्या कालव्यावर अस्तरीकरणाचे काम करणे या व इतर काही मागण्यांवर सर्वांनाच आश्वस्त केले; पण मागील महिनाभरात आयुक्तालयाची मागणी सतत मांडल्यानंतरही त्यावर पवार यांनी मतप्रदर्शन केले नाही.

> मागील काही महिन्यांत पक्षप्रवेश सोहळ्याच्या निमित्ताने मी तिसऱ्यांदा नांदेडला आलो असल्याचे नमूद करून पक्षाचा विस्तार अशाच पद्धतीने होत गेला, तर नांदेड जिल्हा 'राष्ट्रवादीमय' होण्यास वेळ लागणार नाही, असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला. पक्षात कोणी नव्याने आले, तरी आधीपासून काम करणाऱ्यावर अन्याय होणार नाही. सर्वांनी सभासद नोंदणी वाढविण्याकडे लक्ष घालावे, असे आवाहन त्यांनी केले.

> विमानतळावरील स्वागतासाठी पुष्पगुच्छ घेऊन येणाऱ्या कार्यकर्त्यांना पवार यांनी मागील दौऱ्यात कडक शब्दांत दटावले होते. या पार्श्वभूमीवर रविवारी सकाळी त्यांचे विमानतळावर आगमन झाल्यानंतर जिल्हाधिकारी कर्डिले आणि पोलीस प्रमुख अबिनाशकुमार, जि.प.च्या सीईओ मेघना कावली यांनी पवार यांचे स्वागत ग्रंथभेटीने केले. पण आ.चिखलीकर व इतर उपस्थितांनी गुलाबपुष्प देऊन उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

# बियाणे, खते विक्रीवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथके

**जालना :** बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशक खरेदीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी कृषी विभागाकडून जालना जिल्ह्यात नऊ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे या संदर्भात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक याप्रमाणे आठ तक्रार निवारण केंद्रही सुरू करण्यात येणार आहेत.

आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांची मागणी आणि उपलब्धता यासंदर्भात कृषी विभागाने नियोजन केले आहे. अप्रमाणित बियाणे, खते आणि कीटकनाशक विक्रीत शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी भरारी पथकांच्या मार्फत लक्ष ठेवण्यात येणार आहे.

बियाणे, खते आणि कीटकनाशकांचे २०२४ या वर्षात ९३३ नमुने अप्रमाणित आढळले होते. यापैकी २३ प्रकरणात न्यायालयात खटले दाखल करण्यात आले. ३७ प्रकरणांत संबंधितांना ताकीद देण्यात आली असून उर्वरित ७३ प्रकरणील कारवाई प्रक्रियेत असल्याची माहिती कृषी अधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांना दिली.

# हेडगेवार रुग्णालयातील सांघिक भावनेचा ' एम्स' साठीही उपयोग

## अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे यांना विश्वास

**जालना :** छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयात सांघिक पध्दतीने काम करण्याचा अनुभव असल्याने नागपूर ह्यएम्स'चे संचालन करताना तो कामाशी येईल, असे मत नागपूर ' एम्स' चे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे यांनी येथे सांगितले. भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या वैद्यकीय शिक्षण आणि सुविधा देणाऱ्या नागपूर येथील 'एम्स' च्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबदल डॉ. पंढरे यांचा सम्यक परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

आपल्या मूळ शहरातील सत्कार प्रसंगी बोलताना डॉ. पंढरे म्हणाले, की नागपूर शहरातील 'एम्स' मध्ये दररोज सुमारे चार हजार जण तपासणीसाठी येतात. त्यातील ७५० रुग्ण दाखल करून घेतले जातात. दोन महिन्यांपूर्वी आपण जेव्हा या संस्थेच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला तेव्हा येथील कर्मचारी आणि डॉक्टरांच्या ६० टक्के जागा रिक्त होत्या. नव्याने ५०७ जागा भरण्यास मंजुरी मिळाली आहे. या संस्थेत सांघिकपणे काम करू.

प्रमुख पाहुणे डॉ. विजय चौथाईवाले यावेळी म्हणाले की, कुठलीही संस्था चालविताना तेथील नेतृत्वाकडे त्याग, समर्पण, सांघिक भावना आणि सातत्य आवश्यक असते. अनेक प्रलोभने येऊनही डॉ. पंढरे यांनी हेडगेवार रुग्णालय सोडले नाही. स्पष्टवक्तेपणा, समोरच्यास जाणून घेण्याची हातोटी आणि सांघिक भावनेवर विश्वास ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे १९८८ मध्ये १५ खाटांचे असलेले छत्रपती संभाजीनगरमधील हेडगेवार रुग्णालय सध्याच्या विस्तारित रूपात दिसत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवागिरी प्रांत चालक अनिल भालेराव यांची या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. भालेराव आणि सुनीता पेंढारकर यांची भाषणे यावेळी झाली. सम्यक परिवाराच्यावतीने अतुल वझरकर, विजय देशमुख आणि इतरांनी उपस्थितांचे स्वागत केले.